# डॉ. पंजाबराव देशमुख : शेती आणि शेतकरी संघटना

**डॉ. प्रशांत हरमकर**

सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,

या.द.व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा, जि. अमरावती

**गोषवारा:**

*डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जीवनातील कार्यावर आधारित या लेखात, त्यांच्या सामाजिक, आर्थिक, व राजकीय योगदानाची चर्चा केली आहे. त्यांनी भारतातील शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करून त्यांच्या आर्थिक स्थितीतील सुधारणा करण्यासाठी विविध उपाययोजना सुचवल्या. शेतकरी संघटना आणि सहकार विपणन व्यवस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत करण्याचे त्यांनी आवाहन केले. शेती उत्पादन वाढवण्यासाठी आधुनिक पद्धतींचा स्वीकार आणि कृषी उद्योगाच्या स्थापनेवर त्यांनी भर दिला. त्यांच्या या कार्यामुळे भारताच्या कृषी क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडवून आले आहेत.*

**बीज शब्द:** डॉ. पंजाबराव देशमुख, शेती, शेतकरी संघटना, शेतकरी समस्या

**प्रस्तावना :-**

असे फारच कमी राजकीय नेते आहे की, ते राजकारण करतांना सामाजिक कार्यामध्ये सहभागी झाले. त्यांचा सामाजिक आणि इतर कार्यातील सहभाग म्हणजे त्यांनी त्यांच्यामधील उर्जेचा उपयोग सामाजिक आणि इतर कार्यासाठी करून घेतला. यांना शिक्षणमहर्षी, लोकमहर्षी आणि समाजसुधारक म्हणून ओळखल्या जाते. यामध्येच त्यांची अदम्य क्षमता दिसून येते. अशी अदम्य क्षमता घेऊन सामाजिक, आर्थिक व राजकीय कार्यात ठसा उमटविणारे डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख होय. त्यांनी त्यांच्या जीवनातून त्यांचे कार्यकतृत्व सिद्ध केले. सर्वसामान्यांना सार्वजनिक वस्तू संपादित करता याव्यात याकरिता राजकारणाचा उपयोग केला. केवळ प्रशासकिय कृती केल्या नाही तर रचनात्मक कार्याव्दारे सामान्य लोकांना लाभ प्राप्त करून दिले. त्यांच्या कार्यामध्ये विविधता होती व काम करण्याची अफाट क्षमता होती.

ते अनेक समित्या परिषदा आणि मंडळाचे अध्यक्ष अथवा सदस्य होते. ऐवढे सगळे सांभाळून त्यांना सामान्य लोकांना न्याय देणे अशक्य वाटत होते. पण त्यांनी अशक्यांचे रूपांतरण शक्यामध्ये केले. त्यांच्या कार्याकडे प्रत्येक व्यक्ती आणि व्यक्ती समूह वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहतो. त्यांनी अनेक संकल्पना मांडल्या. या सर्व संकल्पनांनी त्यांचे जीवन व्यापून टाकले होते. भारताच्या शेतकरी संघटनेचे किंवा शेतकरी चळवळीचे ते आद्य संस्थापक होते. म्हणून त्यांना शेतकरी संघटनेचे जनक असे म्हणतात.

**भारतातील शेती आणि शेतीच्या समस्या :-**

शेती आणि शेतकरी हा डॉ. पंजाबराव देशमुखाचा अत्यंत आवडीचा विषय होता. ते शेतकऱ्यांना त्यांच्या हृदयापासुन दूर ठेवू शकत नव्हते. त्यांना विश्वास होता की, शेतकरी एकमेकांशी जुळण्याकरीता शेतकऱ्यांचे संघटन असणे आवश्यक आहे. त्यांना विश्वास होता की, शेतकरी त्यांच्या समस्या सोडवू शकले तर निश्चितपणे त्यांच्या परिस्थितीत सुधारणा होईल. त्यांच्या मते तत्कालीन कालावधीमध्ये १० पैकी ७ व्यक्ती कृषी क्षेत्रावर अवलंबून होते. बहुसंख्य लोकांची जिविका शेती हीच होती. इ.सन. १९५५ मध्ये देशाच्या एकूण उत्पन्नापैकी ५० प्रतिशत उत्पन्न शेतीमधून प्राप्त होत होते. यामध्ये पशुपालन व संबंधित व्यवसाय समाविष्ट होता.

देशामध्ये शेती हा असंघटीत व्यवसाय होता. देशातील उद्योग यशस्वी होते पण ते शेतकऱ्याच्या परिश्रमावर अवलंबून होते. त्यांचे मत होते की, भारतातील शेती व्यवसाय हा पूर्णत: निसर्ग आणि ऋतुच्या अनियमिततेवर अवलंबून आहे. या अनियमिततेचा प्रतिकूल परिणाम भारतीय शेतीवर घडून आला आहे. यामुळे शेतकऱ्याच्या जिवीकेवर परिणाम होऊन भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बिघडलेली आहे. शेतकऱ्याच्या अनेक पिढ्या कर्जामध्ये जन्मलेला आहे आणि शेतकऱ्यांना कर्जाशिवाय कोणता वारसा नाही. यामुळे कृषी क्षेत्राला अपंगत्व प्राप्त झाले आहे. परिणामत: केवळ कृषी अर्थव्यवस्थेला कृतीशील आणि पुर्न: कृतीशील करण्याची गरज नाही तर संपूर्ण देशाच्या आर्थिक संरचनेलाच कृतीशील आणि पुर्न:कृतीशील करण्याची गरज आहे. देशाला सर्वच पातळयावर विकास साध्य करायचा आहे. असे असतांना उत्पादन घटकामध्ये तटस्थता आहे. ही तटस्थता दिर्घकाळपर्यंत परवडणारी नाही. म्हणून कृषी विकास समर्थपणे घडवून आणण्याची आवश्यकता आहे. याकरीता कृषी क्षेत्रामध्ये परिवर्तन घडवून नवीन मार्ग स्विकारण्याची आवश्यकता आहे. अर्थव्यवस्थेत उत्पादनामध्ये आधिक्य आणि शाश्वतता आणण्याची आवश्यकता आहे. तरच शेतकऱ्याची आर्थिक स्थिती सुधारेल हे या देशाचे वास्तव असल्याचे त्यांचे मत होते.

गेल्या काही वर्षापासुन शासन धोरणात्मक पाठपुरावा करित असल्यामुळे शेतकऱ्यांना विविध मार्गाने मदत होत आहे. यामध्ये कृषी उत्पादन टप्याटप्याने वाढविण्याचा विचार आहे. याकरिता विविध राज्याचे परिश्रम व शेतकऱ्याचे परिश्रम कारणीभूत ठरले आहे. याचा परिणाम असा झाला की, कृषी उत्पादन वाढले. यामुळे भविष्यातील आपत्तीचा सामना करणे शक्य झाले आहे. सोबतच कृषी वस्तूला योग्य किंमत मिळणे आवश्यक आहे. कृषी किंमतीचे मापण प्रचलित होणे आवश्यक आहे. कृषी किंमतीवर नियंत्रण असणे आवश्यक आहे. शेतकऱ्याच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा घडून येत असतांना हे बदल जाणवले पाहिजे. अपेक्षापेक्षा बदल वेगाने घडून आले पाहिजे. काही कृषी उत्पादनाच्या किंमती घसरतात. किंमत घसरण म्हणजे कृषी क्षेत्रात अडचणी आहेत. शेतकऱ्याचा उत्पादन व्यय उच्चत्तम पातळीपर्यंत वाढत असतांना किंमतीमध्ये घसरण घडून आली आहे. अशा प्रकारची स्थिती कृषी ऐलर क्षेत्रामध्ये दिसून येत नाही. किंमत घसरणीचा परिणाम हा शेतकऱ्याच्या उत्पन्नावर होतो. म्हणून उत्पादन वाढत असतांना उत्पादन व्यय वाढून किंमतीमध्ये घसरण व्हायला नको ही गभीर समस्या आहे. ही समस्या सोडविल्या गेली नाही तर कृषी उत्पादक आणि उत्पादन दोन्ही प्रभावित होतील म्हणून यावर लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता आहे.

आपल्याला अडचणीवर मात करायची आहे. याकरिता शेतकऱ्यांना दिलेल्या किंमत पातळीकडे पहावे लागेल. किंमती या उत्पादकांना मोबदला देणाऱ्या असायला पाहिजे आणि उपभोक्त्यांना त्या स्विकार्य असायला पाहिजे. जर शेती उत्पादन कार्यक्रमाची दुर्बळपणे अंमलबजावणी झाली आणि शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून वाचवायचे असेल तर किंमतीत झालेल्या घसरणीचे मापन होणे आवश्यक आहे. किंमत घसरणीचे मापन करणे सोपे कार्य नाही. केवळ शासनाने उपाय करून परिणाम मिळणार नाही. याकरिता शेतकऱ्याचे कृतीशील सहकर्य मिळणे अपेक्षित आहे. जर कृषी उत्पादनाच्या किंमती विशिष्ट पातळीपर्यंत आणायच्या असतील तर मोठ्या प्रमाणात मापकांना समजवून घ्यावे लागेल. एकत्रितपणे कृती शासन आणि शेतकऱ्याला करावी लागेल. कृषी क्षेत्राची वास्तविकता समजून घेत असतांना शासन ते शेतकरी यापर्यंत अडचणी कशा आहे त्या समजवून घ्याव्या लागेल. याकरीता सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. जर शेतकरी एकत्रित आले तर त्यांच्या समस्यावर चर्चा घडून येईल. यामधुन शेतकऱ्याच्या संघटना अथवा चळवळी निर्माण होऊ शकतात. याव्दारे शेतकऱ्यांना त्यांच्या समस्या शासनासमोर मांडता येईल. जेणे करून शेतकऱ्यांना सहाय्य करता येईल. यामध्ये कृषी क्षेत्राशी संबंधित सर्वच क्षेत्र राहतील. परिणामत: कृषी क्षेत्राची स्थिती अधिक सुसंगत आणि सुलभ निर्माण होईल.

शेतीला व्यवसायाचा महत्वाचा घटक म्हणून पाहिल्या गेले पाहिजे. शेतीच्या बाह्य स्वरूपात बदल करण्याची आवश्यकता आहे. कारण या बाह्यस्वरूपात त्रुट्या आणि गैरसमजुती मोठ्या प्रमाणात आहे. म्हणून अपयशी शेतकऱ्यांना मदत करण्याची आवश्यकता आहे. शेतीकडे शेवटचा पर्याय म्हणून बघितल्या जाते म्हणून शेती मागे पडत आहे. यामध्ये शेतकऱ्याच्या जिविकेकरिता सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्याच्या बाबत म्हटल्या जाते की, तुम्ही अल्प आहात; तुमच्याकडे भौतिक व अभौतिक साधनाची कमतरता आहे. शेतीला विकसित करायचे असेल तर इतर व्यवसायाकडून बोध घेणे आवश्यक आहे. शेतकरी त्यांच्या व्यवसायामध्ये पारंगत झाले पाहिजे. शेतकऱ्यांनी स्वत:ला अद्यावत केले पाहिजे. शेतीचे उपपयोजन करतांना सुधारणा केल्या गेल्या पाहिजे. शेती हा अगतिशील व्यवसाय नाही. हा व्यवसाय करतांना सातत्याने त्यामध्ये शिकावे लागते. संशोधक आणि प्रयोगशाळा कडून सातत्याने शिक्षणाचा प्रवाह शेतीपर्यंत येणे आवश्यक असते. तरच शेती हा खात्रीशीर उत्पन्न मिळून देणारा व्यवसाय होईल. शेती ही जिविका असून ती उत्पादकीय असायला पाहिजे. तरच शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारची शेती करण्यास मदत होईल.

**सहकार विपणन व्यवस्था :-**

भारताचा ग्रामिण ऋण सर्व्हेक्षण (All India Rural Credit Survy 1955) अहवालामध्ये शेत विषयक शिफारशी केल्या आहे. डॉ. पंजाबराव देशमुखाच्या मते या शिफारशीचा गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. या अहवालामध्ये प्रत्येक शेतकऱ्याला कर्ज देण्याचे समर्थन केले आहे. सहकारावर आधारीत संघटीत कृषी बाजार संस्था निर्माण करण्याचा प्रस्ताव आहे. कृषी बाजार संस्थाचे जाळे निर्माण करण्याची आवश्यकता आहे. शेतीचे उत्पादन उपभोक्त्यासाठी केले पाहिजे. यामध्ये प्रमुख वाटा देय किंमतीचा राहील ही वास्तविकता समजवून घ्यायला पाहिजे. म्हणून कृषी उत्पादनासाठी सहकार विपणन व्यवस्था असणे आवश्यक आहे. भारताच्या ग्रामिण ऋण सर्व्हेक्षण अहवालामध्ये कृषी उत्पादनासाठी संघटीत सहकारी विपणन व्यवस्थेवर भर दिला आहे. त्याला प्रत्यक्षात महत्वाचे स्थान देण्याची आवश्यकता डॉ. पंजाबराव देशमुखांनी अधोरेखीत केली आहे. सहकारी विपणन व्यवस्था शेतकऱ्याकरीता यशस्वी संघटन राहण्याचा त्याचा आत्मविश्वास होता. त्याचे मत होते की, या सहकार विपणन व्यवस्थेचे यश शेतकऱ्यांचे हित आणि पुढाकार यावर अवलंबून राहील. याकरीता सहकार विपणन व्यवस्थेचा विस्तार घडवून आणावा लागेल. मध्यस्थाचे उच्चाटन करावे लागेल हे सर्वोत्तम उपाय करण्याची संधी सहकार विपणन व्यवस्थेमुळे निर्माण झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांना लाभ प्राप्त होणार आहे. याकरिता कायदेशीरपणे सहकार विपणन संघटन स्थापन करून घेणे आवश्यक आहे.

**कृषी उत्पादन व्यय :-**

शेतकऱ्याच्या उत्पन्नामध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. याकरिता उत्पादन व्यय किमान असण्याकरीता प्रयत्नशील असण्याची आवश्यकता आहे. उत्पादन व्ययामध्ये बदल करण्याचा प्रभावी मार्ग म्हणजे लहान धारण क्षेत्र एकत्रित करून लहान धारण क्षेत्राची जोडणी करण्यास परवानगी शेतकऱ्यांना देण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत उत्पादनाचा घटक मोठा होत नाही तोपर्यंत शेती आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. शिवाय शेतीमध्ये आधिक्य उत्पादन घडून येण्याची संभाव्यता कमी असते. पण लहान धारण क्षेत्र जोडणीमध्ये अनेक प्रकारच्या अडचणी आहे याची जाणीव डॉ. पंजाबराव देशमुखांना होती. कारण याला शेतकऱ्यासह इतरांची मान्यता मिळण्यामध्ये अनेक प्रकारच्या अडचणी आहे. या मार्गाचा उपयोग करण्याचे उद्दीष्ट म्हणजे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात हित साध्य करण्याचे आहे. कारण शेतकऱ्याकडे अनार्थिक (Non-economic) धारण क्षेत्र आहे. यामुळे शेतकरी शेती वाहू शकत नाही. अंतिमत: शेतकऱ्यावरचे कर्ज वाढून ते कर्जबाजारी होतात.

शेतकरी हा त्याच्या शेतीशी लौकिक दृष्ट्या जुळलेला असतो याची जाण डॉ. पंजाबराव देशमुखांना होती. म्हणून शेतकऱ्याच्या शेतीला वैयक्तिक पातळीवर प्रोत्साहन मिळण्याची

आवश्यकता आहे. वैयक्तिक पातळीवर प्रोत्साहन देणे या मापकाचे उद्दीष्ट कृषी क्षेत्रामध्ये सुधारणा करण्याचे आहे. कृषी क्षेत्रामध्ये सुधारणा घडवून आणणे हा राष्ट्रीय विकासाचा महत्वपूर्ण भाग आहे. मात्र कृषी व्यवसायामध्ये रूढीवादी पद्धती आणि भावनांना प्राधान्य आहे. यापेक्षाही कृषी उत्पन्न घेतांना उत्पादन घटकाचा विचार होण्याची आवश्यकता आहे. केवळ उत्पादनामध्ये सुधारणा करून चालणार नाही तर प्रति एक्करी उत्पादन वाढवणे आवश्यक आहे. सोबतच प्रतिव्यक्ती उत्पन्न वाढणे आवश्यक आहे. याकरिता डॉ. पंजाबराव देशमुखांना सहकार शेती ही सर्वोत्तम संधी वाटत होती. यामुळे उत्पादन वाढ घडून उत्पादन व्ययामध्ये कपात घडून येईल, असे त्यांना अभिप्रेत होते.

**प्रति एकरी उत्पादकता वाढ :-**

जगामध्ये भारताची प्रति एकरी उत्पादकता फार कमी आहे म्हणून डॉ. पंजाबराव देशमुख असे म्हणतात की, आपल्या सांस्कृतिक पद्धती व प्रत्यक्ष कृतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. शेतीची प्रति एकरी उत्पादकता वाढविण्याकरीता शेतीमध्ये खताचा उपयोग होण्याची आवश्यकता आहे. यामुळे प्रति एकरी उत्पादकता वाढेल. शेतीमध्ये बदल करतांना अगदी साध्या सूचना नांगरावरच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचण्याची आवश्यकता आहे तरच उत्पादनामध्ये क्रांतीकारक बदल होऊ शकतात. असे क्रांतीकारक बदल भात शेतीमध्ये घडून आले आहे. यामुळे उत्पादन वाढले व अभूतपूर्व यश तांदुळ उत्पादनामध्ये प्राप्त झाले आहे. डॉ. पंजाबराव देशमुखांचा विश्वास होता की, जर जपानच्या भात शेती पद्धतीचा शेतकऱ्यांनी स्विकार केला तर संपूर्ण देशातील तांदुळाचे उत्पादन दुप्पटीने वाढेल. याकरीता जास्त खर्च सुध्दा येणार नाही. जपानी पद्धतीच्या भात शेतीचा ज्या प्रदेशामध्ये स्विकार केला आहे तेथील उत्पादन 24 प्रतिशतने वाढले आहे. जे जपानच्या सरासरीच्या 1/3 होते. डॉ. पंजाबराव देशमुखाचे असे मत होते की, जर आपण तांदुळाचे उत्पादन 100 प्रतिशतने वाढविले तर त्याचे काय परिणाम घडून येईल याची आपण कल्पना करू शकतो. म्हणून आधुनिक पिक पद्धतीचा स्विकार करण्याची आवश्यकता यावर त्यांनी भर दिला आहे.

सर्व शेतकऱ्यांनी स्वत:च्या परिश्रमाबाबत जागरुक असायला पाहिजे. कारण यामध्ये निम्मे प्रयत्न हे शासनाचे राहणार आहे. प्रायोगिक तत्वावर सर्वोत्तम शेती उत्पादन करणाऱ्या पद्धतीचे मापण करता आले पाहिजे. यामुळे उत्पादनामध्ये वाढ घडून येईल. अशा प्रयोगाचे लाभ प्राप्त झाले तर मोठ्या प्रमाणात उत्पादन वाढ घडून येईल. देशामधील सर्व शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनाच्याव्दारे पुढाकार घेवून आधुनिक शेती पद्धतीचा प्रसार केला पाहिजे. या कृतीला सर्वोत्तम केले पाहिजे. कृषी क्षेत्रामध्ये आधिक्य उत्पादन निर्माण होऊ शकते. याकरिता शेतकरी संघटनाकडून शिफारशी येणे आवश्यक आहे. म्हणून कृषी उत्पादन वाढविण्यासंबंधीचे अध्ययन होणे आवश्यक आहे. यामुळे प्रत्यक्षात उत्पादन वाढविणे शक्य होईल. राज्याने सर्व शेतकऱ्यांना सर्व प्रकारच्या संभाव्य सुविधा प्राप्त करून दिल्या पाहिजे. आधिक्य उत्पादन निर्माण करायचे असेल तर कृषी उत्पादनाचे नियोजन करणे आवश्यक आहे. या करिता राज्यासोबत सल्लामसलती शेतकरी संघटनांनी करणे आवश्यक आहे. या मार्गाचा अवलंब करतांना आधिक्य उत्पादन घेण्याकरीता जाचकता नसावी आणि फाजीलपणा असु नये कारण यामुळे जलद गतीने कृषी उत्पादनाच्या किंमतीमध्ये घसरण घडून येते असे डॉ. पंजाबराव देशमुखांचे मत होते.

**कृषी उद्योग :-**

कृषी क्षेत्रामधील कार्य हे हंगामी स्वरूपाचे असते. शेतकऱ्याचा हंगाम संपला की, त्यांना बराच काळ विश्रांती असते. यामध्ये शेतकऱ्याचे बरेच महिने जातात. पिकाची कापणी झाल्यानंतर शेतकऱ्यांना रोजगार नसतो. यावर परिणामकारक उपाय म्हणजे कृषी उद्योगाचे जाळे निर्माण केले पाहिजे असे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे मत होते. त्यांच्या मते कृषी उद्योग हे सहकाराच्या आधारावर स्थापन करता येतात. याकरीता कृषी उत्पादन जेथे होते त्यांच्या जवळच निवडक स्थळी उत्पादन केंद्र निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यामुळे शेतकऱ्याच्या हंगामी

बेरोजगारीकरिता दीर्घकालीन उपाय करता येईल. या कृषी उद्योगाचे वैशिष्ट म्हणजे हे उद्योग हंगामी रोजगार निर्माण करणारे आहे. यामुळे शेतकरी पिक कापणीच्या नंतरच्या विश्रांतीच्या काळात या उद्योगामध्ये सहभागी होऊ शकतो. या उद्योगाच्या स्थापनेमागे केवळ आपल्या गरजा पूर्ण व्हाव्या ऐवढे मर्यादित उद्दीष्ट नाही तर हे उद्योग यशस्वीपणे उभारल्या गेले पाहिजे. उद्योगाचे विकेंद्रिकरण झाले पाहिजे. यामुळे शेतकऱ्यांना मदत होवून उत्पन्न प्राप्तीमध्ये सुधारणा घडून येईल. हे तत्व स्विकारल्या गेले तर या क्षेत्रातील इतर अभिकरण (Agencies) आणि शासनासोबत सल्लामसलत करून याबाबत संपूर्ण मांडणी करता येईल. यामध्ये ग्रामिण वाहतूक हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. याला व्यवस्थाबद्धरित्या विकसित करण्याची आवश्यकता आहे. याचा शेतकरी उत्पादकांना लाभ होईल असा आत्मविश्वास डॉ. पंजाबराव देशमुख यांनी व्यक्त केला होता.

**महिला शेतकरी व युवक :-**

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या मते या देशतील शेतकऱ्यांसोबत शेतामध्ये त्यांच्या पत्नी प्रत्यक्ष काम करतात. या देशातील महिला म्हणून त्यांची ओळख आहे. जोपर्यंत शेतकरी महिलांना आपण पुढे घेऊन जात नाही, त्यांना संधी उपलब्ध करून देत नाही तोपर्यंत शेतकरी संघटनेच्या कर्तृत्वाला आणि कृतीला सहाय्य मिळणार नाही. स्त्री सक्षमता निर्माण करतांना केवळ त्यांच्या कामाच्या वाट्यावर भर न देता त्यांचा विचार विनिमयामध्ये सहभाग वाढविणे आवश्यक आहे. स्त्रीयांनी शेतकरी संघटनेला सल्ले देखील दिले पाहिजे. यामुळे केवळ देशाचीच प्रगती घडून येणार नाही तर सर्वांगीण प्रगती घडून येईल. शेतकरी संघटनेला निश्चित असे स्थान प्राप्त करून घ्यायचे असेल तर शेतकरी स्त्रीयांना शेतकरी संघटनेमध्ये सामावून घेणे आवश्यक आहे. यामुळे या देशातील स्त्रीया त्याचे योगदान जागतिक पातळीवर देऊ शकतील.

शेतीमध्ये काम करणाऱ्या युवकांनी त्यांच्या कार्यामध्ये योग्य समन्वय साधण्याची आवश्यकता आहे. डॉ. देशमुखांच्या मते हा देश भाग्यशाली आहे की, या देशामध्ये असंख्य तरुण आहे. हे तरूण कृषी क्षेत्रामध्ये कार्यरत आहे. ते शेतीवर प्रेम करतात आणि देशाची सेवा करतात. या तरूणांना सहाय्य करण्याची आवश्यकता आहे. युवकाचे राष्ट्रबांधणीच्या रचनात्मक कार्यामध्ये मोठ्या प्रमाणात योगदान मिळू शकते. म्हणून युवकांकरीता संघटनेच्या रचनेमध्येच नियोजन करणे आवश्यक आहे. शेतकरी समुदायाचे कार्य हे स्वतःच्या गटाशी संबंधित असलेच पाहिजे. पण त्याचबरोबर इतरांना सहकार्य केले पाहिजे. प्रथम, आपण सर्व शेतकरी आहोत. यामध्ये पुरूष, स्त्रीया आणि युवक सामील आहे. व्दितीय महिलांकरिता ग्रामिण महिला संघटना असणे आवश्यक आहे. तृतिय लिंग दृष्टीकोनातून दोन्ही बाजूंनी तरूण शेतकरी आहे. हे लक्षात घेऊन योग्य मार्गाने शेतकरी संघटना निर्माण करण्याची आवश्यकता आहे. शेतकरी संघटनेची स्थापना खेड्यामधून झाली पाहिजे. त्याचे गट तहसिल पातळीवर असले पाहिजे. यानंतर हे गट जिल्हा आणि राज्य पातळीवर एकत्रित असायला पाहिजे. संघटनाची साखळी निर्माण व्हायला पाहिजे. या संघटनाची बांधणी ही मजबूत असायला पाहिजे. या शेतकरी संघटनांनी देशातील नामांकित कृषी स्थळांना भेटी दिल्या पाहिजे. देशातील कृषी क्षेत्राची स्थिती व धान्याचा साठा जाणून घेतला पाहिजे.

**शेतकरी संघटना :-**

शेतीचा सर्वांगीण विकास घडून येण्याकरीता शेतकरी संघटनाची आवश्यकता आहे. शेतकरी संघटनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देशाकरीता सेवा देता येते. शेतकरी संघटनेचा उपयोग शेतकऱ्यांची मते आणि दृष्टिकोन मांडण्यासाठी होऊ शकतो. यामुळे शेतकऱ्यांचे संघटन शेतकऱ्यांकरीता अनेक बाबी घडवून आणू शकतो. शेतकऱ्याची चळवळ अराजकीय असायला पाहिजे. शेतकरी चळवळीने शेतकऱ्यांच्या व्यावसायिक कार्याला मध्यवर्ती स्थान दिले पाहिजे. कृषी उत्पादने आणि शेतकऱ्याच्या कल्याणाला प्राथमिक स्थान दिल्या गेले पाहिजे. शेतकरी चळवळी अंतर्गत शेतकऱ्यांच्या सर्वसाधारण सभा घडून आल्या पाहिजे. शासनाचे अधिकारी, कृषी

संशोधक, उद्योगपती, बाजार तज्ञ हे या चळवळीच्या कार्यकारीणीचे कायदेशीर सदस्य असायला पाहिजे. या शेतकरी चळवळीमध्ये प्रत्यक्ष शेतीमध्ये काम करणाऱ्या पुरूष आणि स्त्रीयांनी देशाच्या कृषी अर्थव्यवस्थेचे सामर्थ्य वाढविण्याची रूची दाखवली पाहिजे. सर्वांनी एकत्र येऊन आपल्या बुध्दीमत्तेचा उपयोग शेतीच्या विकासाकरिता केला पाहिजे. उर्जा आणि संसाधनाचा महत्तम उपयोग झाला पाहिजे. प्रत्येक दिवशी कृषी क्षेत्रातल्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. या कार्याला मदत करण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याने स्वत:ला जुळवून घेतले पाहिजे. शेतकऱ्यांनी आपली भूमी आधिक्याने उत्पादन करण्याकरीता निर्माण केली पाहिजे.

शेतकऱ्याचे संघटन अथवा चळवळ या राजकीय विचारसरणीशी जोडल्या जाऊ नये अथवा राजकीय प्रभावाखाली काम करू नये. या संघटनांनी देशातील कृषी उत्पादक प्रस्तुत केला पाहिजे. त्याचा आवाज उठविला पाहिजे. कशाचीही पर्वा न करता शेतकरी हिताशी संघटनाचे संलग्निकरण असायला पाहिजे. शेतकऱ्यांचे संघटन हे खाजगी असून यामध्ये शासनाचा हस्तक्षेप नसायला पाहिजे. शेतकऱ्यांचे कल्याण आणि हित यावर भर देणाऱ्याचे शेतकरी संघटनेमध्ये स्वागत असायला पाहिजे. अनेक वेळा शेतकरी अडचणीमध्ये असतो पण त्याच्या वतीने बोलल्या जात नाही याची चिंता डॉ. पंजाबराव देशमुखांना भेडसावत होती. पुरेशा प्रमाणात शेतकऱ्याचे हित संरक्षित करण्याकरीता त्यांच्यामध्ये सक्षमता नाही. शेतकऱ्याचे हित लक्षात घेता त्यांना परिणामकारक संरक्षणाची तरतुद आवश्यक आहे. हि स्थिती एखाद्या शेतकऱ्याची नसुन सर्वच शेतकऱ्याची आहे. शेतकरी संघटना असल्या तरच शेतकऱ्यांच्या समस्याचे निराकरण होऊ शकते, यावर डॉ. पंजाबराव देशमुखाचा ठाम विश्वास होता.

भारतीय शेतकरी शोषण आणि दुर्लक्षितपणा यांच्या व्यथा दीर्घकाळापासून सहन करित आहे. हा सर्व दैवाचा भाग आहे म्हणून तो विनातक्रार सहन करित आहे. यामुळे त्याच्या मानसिकतेवर परिणाम होऊन त्याच्या जीवनात स्थैतिकता आणि निराशावाद निर्माण झाला आहे. यामुळे शेतकऱ्याच्या सामाजिक जीवनामध्ये बिंबवणे आवश्यक आहे की, शेतकऱ्यानी एकत्रितपणे कार्य केले पाहिजे. शेतीमध्ये गतिशीलता निर्माण केली पाहिजे. याकरिता त्यांना मानसिक दृष्ट्या तयार केले पाहिजे. शेतकऱ्याच्या समस्या समजवून घ्यायला पाहिजे. शेतकऱ्याच्या समस्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूपाच्या आहे. या समस्यावर विचार करून उपाय सुचविल्या गेले पाहिजे. याचे प्रत्यक्ष परिणाम मिळायला पाहिजे. हा हेतू साध्य करण्याकरिता शेतकरी संघटनांनी जिकरीने कार्य केले पाहिजे.

**प्रशासन आणि शेतकरी संघटना :-**

सामंत जमिनदार पद्धती दीर्घकाळ अस्तित्वात राहणार नाही. यामुळे शेतकरी आधिक्याने मुक्त आणि सुरक्षित होईल. दीर्घकाळापासुन जमिनदारांना शेतकऱ्यांचे प्रमुख मानल्या जात होते. जमिनदाराच्या मार्फत प्रशासन केल्या जात होते. आता जमिनदारी पद्धती नाहिशी झाल्यामुळे प्रशासन आणि शेतकरी यामध्ये मोठे अंतर निर्माण झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांनी परिणामकारकपणे पूल जोडणीचे काम करायला पाहिजे. शेतकऱ्यांनी स्वत:ला प्रशासनाशी जोडून घेण्याचे काम करायला पाहिजे. याकरीता शेतकरी संघटनेने योग्य यंत्रणेची तरतूद निर्माण करण्याची आवश्यकता आहे. शेतकरी संघटनेने केवळ शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून कार्य करू नये तर शेतकरी आणि प्रशासन यामधील संपर्क जोडून ठेवण्याचे कार्य करण्याची आवश्यकता आहे. सामुहिक प्रकल्प प्रशासन (Community Project Adminstration) आणि राष्ट्रीय विस्तार सेवा (National Extension Service) याबाबत साशंकता बाळगू नये. या दोन्ही सेवा शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या आहे. शेतकऱ्यांना उदभवणाऱ्या समस्यांवर त्या सल्ला देणाऱ्या सेवा आहेत. शेतकरी संघटनांनी यांना बदलविण्याचा प्रयत्न करू नये किंवा तसा हेतू बाळगू नये. शेतकरी संघटनांनी यांना पूरक असे कार्य करावे. सामुहिक प्रकल्प प्रशासन आणि राष्ट्रीय विस्तार सेवा यांनी देशाचे मर्यादीत क्षेत्र व्यापले आहे. शेतकरी संघटनांनी विस्तारीत दृष्टिकोन ठेवावा आणि शेतकरी व ग्रामिण

लोकांना मदत करावी. शेतकरी संघटनांचा देशांतर्गत प्रक्रियेमध्ये प्रभावशाली सहभाग असावा. शेतकरी संघटनांनी चर्चेसाठी संधीची निर्मिती करावी. शेतकरी संघटनांनी चर्चा निकडीच्या गरजा व समस्याबाबत घडवून आणाव्या. शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करावा. शेतकऱ्यांची परिस्थिती समजवून घ्यावी. शेतकरी संघटनांनी घेतलेले निर्णय छाप सोडणारे असावे. शेतकरी संघटनांनी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याकरीता अभेद्य युक्तीवाद केला पाहिजे. हे केवळ शेतकऱ्यांची सहानुभूती मिळविण्याकरीता करू नये तर शेतकऱ्यांचे प्रश्न मांडतांना शासनाचा आदर ठेवला गेला पाहिजे.

शेतकरी संघटना सर्वोच्च पातळीवर पोहचण्याकरीता केवळ शेतकऱ्यांनी शेतकरी संघटनेमध्ये सामील होवून चालणार नाही तर शेतकऱ्यांना संघटीत करणे, संघटन बांधणे आणि संघटनेच्या कामामध्ये स्वत:ला झोकून देणे महत्वाचे आहे. शेतकऱ्यांची चळवळ म्हणजे शेतकऱ्यांचे वास्तविक संघटन असायला पाहिजे. शेतकऱ्यांना हे संघटन स्वत:चे वाटायला पाहिजे. शेतकरी संघटनाच्या कार्याचा स्त्रोत हा कल्याणकारी कार्याचा असायला पाहिजे. शेतकरी संघटन ग्रामिण लोकांकरीता निर्माण झाले पाहिजे. ग्रामिण लोकांनी चांगले जीवनमान व्यतीत करण्याची इच्छा शेतकरी संघटनाव्दारे पूर्ण झाली पाहिजे.

**प्रगत देशातील शेतकरी संघटना :-**

शेतकरी संघटना अथवा चळवळ ही काही नवीन संकल्पना नाही. प्रत्येक प्रगत देशामध्ये शेतकऱ्यांनी स्वत: स्थापित केलेल्या शक्तीशाली संघटना आहे. प्रगत देश औद्योगिकदृष्ट्या पुढारलेले असले तरी त्या देशांमध्ये शेतकरी संघटना प्रबळ आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे इंग्लंड आहे. इंग्लंड उच्चत्तम पातळीवर औद्योगिकीकरण झालेला देश आहे. National Farmer Union आणि The National Farmer Union of Scotland या दोन महत्वाच्या इंग्लंडमधील शेतकरी संघटना आहे. या दोन्ही शेतकरी संघटनाचे प्रशासकीय कार्य शेतकरी स्वत: करतात. शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी स्वत: प्रयत्न करतात. इंग्लंडमध्ये अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने शेतकरी संघटन निर्माण झाले आहे. या संघटना शेतकऱ्याचे हीत आणि अधिकाराचे संरक्षण करतात. यामधुनच राजकीय विचार आणि चळवळीचा विस्तार घडून येतो. अमेरिकेमध्ये प्रबळ शेतकरी चळवळ आहे. अमेरिकेमध्ये The American Fram Bureau Federation, The National Farmer Union आणि The Grange या तीन महत्वाच्या संघटना आहे. या सर्व संघटना अमेरिकेमधील शेतकऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक हिताचे रक्षण करतात. सोबतच शेतकऱ्यांचे व्यावसायिक हित जपतात. ग्रामिण भागातील लोकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याची सुरक्षा करतात. कॅनडामध्ये शेतकरी संघटना कार्यरत आहे. शेतकरी संघटनाच्या कार्यामुळे कॅनडाचे शासन शेतीच्या एकूण खर्चापैकी 59 प्रतिशत खर्च करते.

**शेतकरी संघटनेची बांधणी :-**

शेतकरी संघटनांनी विशेष संधी प्रस्तुत केली पाहिजे. समाजाचा आकृतीबंध समाजवादी आहे हे लक्षात घेतले पाहिजे. शेतकऱ्याच्या खांद्यावर मोठी जबाबदारी असून त्यांना नेतृत्व करायला मिळायला पाहिजे. शेतकरी या देशाचा प्राथमिक उत्पादक आहे. त्याला लाभ प्राप्त होणे आवश्यक आहे. त्याच्या जीवनमानाची पातळी उंचावल्या गेली पाहिजे. जीवनमानाची पातळी घसरू नये याची काळजी घेतल्या गेली पाहिजे. देशामधील एकूण कृषी उत्पादनामध्ये वाढ घडून आली पाहिजे. यामुळेच शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याची शक्यता आहे.

भारतातील शेत्यांचे संघटन म्हणजे दीर्घकाळापासून विचार आणि सल्लामसलती करून निर्माण झाले आहे. शेतकरी संघटनामध्ये विचार आणि सल्लामसलती सर्व बाजूंनी घडून आल्या पाहिजे. कृषी क्षेत्राची कार्य, कर्तव्य गृहीत मानून संपूर्ण भारताच्या पातळीवर शेतकऱ्यांशी जोडतांना प्रत्येक टप्प्यावर उणीवा आहेत. याकरिता शेतकऱ्यांचे संघटन महत्वाचे

आहे. म्हणून राज्याच्या कृषी मंत्र्यांनी शेतकऱ्यांकरीता कृषी परिषदाचे यशस्वीपणे आयोजन केले पाहिजे.

शेतकरी संघटनेचा दृष्टिकोन हा संघटनेची बांधणी करण्याचा असला पाहिजे. संघटनेच्या विचारविनिमयाचा मुख्य उद्देश हा शेतकऱ्यांना मदत करणे आणि कृषी क्षेत्राचा विकास घडवून आणणे असला पाहिजे. सर्वच शेतकरी अन्नधान्याचा पुरवठा करतात. त्यामुळे संघटनेमध्ये मोठ्या शेतकऱ्याचे वर्चस्व असू नये. शेतकरी संघटनांचे कार्य केवळ मोर्चे काढणे, जनआंदोलन करणे ऐवढेच मर्यादित नाही. तर प्रत्येक मुद्दा हा शेतकरी हिताचा असला पाहिजे. प्रत्येक मुद्याचे अध्ययन केल्यानंतरच स्वत:चे दृष्टीकोन शेतकरी संघटनेने प्रस्तुत केले पाहिजे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर काळजीपूर्वक विचार व्हायला पाहिजे. शेतकरी संघटनांनी शासनासोबत कर आणि धोरणाबाबत चर्चा घडवून आणली पाहिजे. शासनाचे मन वळवता आले पाहिजे. शासनाचे मन वळवता येणे हेच शेतकरी संघटनेचे प्रमुख साधन आहे. शेतकरी संघटनांनी केवळ दबाव, संघर्ष आणि संप घडवून आणू नये.

शेतकरी संघटनांनी विचाराचा विस्तार केला पाहिजे. या विचारामध्ये मुलभूत तत्व असायला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत संघटन विचलीत होवू नये याची खबरदारी घेतली पाहिजे. संघटनाचा आधार स्वयमनिर्भर असायला पाहिजे. शेतकरी संघटना या केवळ तक्रारी आणि मागण्या करणाऱ्या असू नये. जर आपल्या विचाराची हानी घडून येत असेल तर त्याचे अध्ययन केल्या गेले पाहिजे. आपले विचार योग्य प्रकारे मांडून त्यामध्ये सुधारणा केल्या पाहिजे. हे सर्व उत्तम प्रकारे करू शकतो असे स्पष्ट केले पाहिजे. हे संघटनेचे दुय्यम कार्य आहे. संघटनेचे प्राथमिक आणि मुलभूत कार्य म्हणजे संघटनेने अभ्यास मंडळे स्थापित केली पाहिजे. भारताच्या पुर्ननिर्माणासाठी शेतकऱ्यांनी योगदान दिले पाहिजे. हा शेतकरी संघटनेचा हेतू असायला पाहिजे. शेतकरी संघटना सक्षम करण्याकरिता सामुदायिक मार्ग स्विकारला पाहिजे. संघटनामध्ये स्पुर्ती देणारी नाविण्यता आणल्या गेली पाहिजे. कृती करतांना त्यागाचा अंश असायला पाहिजे. संघटनेमध्ये मुलभूत विचार रूजले नाही तर संघटनेची हानी घडून येईल. आपल्या देशावर प्रेम करतांना संघटनेच्या माध्यमातून महान सेवा घडवून आणली पाहिजे. आपली संख्या लक्षात घेता आपण नाविण्यपूर्ण आवाजाशी जुळलो पाहिजे. शेतकऱ्यांना संघटनेची आवश्यकता आहे. संघटनेचा उपयोग करून शेतकऱ्यांना बोलायला शिकवले पाहिजे. यामध्ये शेतकऱ्यांनी स्वत:च्या संकल्पना मांडायला पाहिजे. यामधून आदर्श घडवायला पाहिजे. संघटनेने शासन आणि इतर अभिकरणांना (Agrncies) सहकार्य केले पाहिजे. सहकार्य करतांना देशाचे हित लक्षात घेतले पाहिजे. यामध्ये अध्ययन आणि समजूतदारपणाचे मूल्य असायला पाहिजे. संघटन हे विस्तारलेले असले पाहिजे. यामध्ये सर्व देशाच्या गरजा अंतर्भूत असायला पाहिजे. नेहमी लक्षात असायला पाहिजे की, आपण एकमेकांशी जुळलेलो असतांना आपली काय भूमिका राहणार आहे. जर आपण ऐकमेकाशी योग्य प्रकारे जुळल्या गेलो नाही तर संकल्पनाची गंमत होईल, त्याची खिल्ली उडविल्या जाईल आणि संघटनेवर आक्षेप घेतल्या जाईल. मात्र डॉ. पंजाबराव देशमुखांना अत्मविश्वास होता की, शेतकरी अशा विचारांना लागू करणार नाही. आक्षेपामुळे भरकटल्या जाणार नाही. म्हणून आपल्यामध्ये (शेतकऱ्यामध्ये) भिन्नता असली तरी शेतकरी संघटनेने उद्देशानुसार कार्यान्वित असणे आवश्यक आहे.

अनेकांच्या मनामध्ये प्रश्न आहे की, संघटनेच्या बाहेर राहून राजकारण कसे करता येईल. याबाबत फार काळजी करण्याची आवश्यकता नाही. यामागे शतकाचा अनुभव आहे. भारतातील शेतकऱ्याबाबत साशंक असू नये. शेतकरी संघटनेमध्ये राजकारण मिसळण्याच्या आमिषाला परवानगी देऊ नये. याकरीता आपण अमेरिकेकडून धडा शिकलो पाहिजे. अमेरिकेतील काही मोठ्या शेतकरी संघटना काही काळातच कोसळल्या होत्या. कारण त्यांचा उपयोग राजकारणाकरीता झाला. असा अनुभव लक्षात घेता भारतातील शेतकरी त्याला मान्यता देणार नाही. कारण राजकारणामधुन शेतकरी संघटना नष्ट होवू शकतात. यावर डॉ. पंजाबराव देशमुखाचा ठाम विश्वास होता.

**समारोप :-**

आजही शेतीच्या समस्या या शेतकऱ्याच्या अतिगंभीर आर्थिक समस्याचा भाग आहे. आजही देश या समस्याचा सामना करीत आहे. राज्याचे धोरण हे शेतीच्या समस्या सोडविणारे असले पाहिजे. समस्या सोडविणारी परिणामकारक मापके शासनाकडे असायला पाहिजे. कारण शेतकरी समुदाय या व्यवस्थेचा कणा आहे. शेतकरी या देशाचा दैवत आहे. याकरिता शेतकऱ्याकडून सूचना आणि शिफारशी येण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यानी सूचना आणि शिफारशी शेतकरी संघटनेव्दारे दिल्या पाहिजे. यामुळे देशाचे धोरण आणि शेतकऱ्यांच्या समस्या सोडवणूकीमध्ये योग्य प्रकारचा मेळ बसू शकतो. शेतकरी संघटना या प्रभावीपणे अशा द्विमार्ग - श्रृंखलाचा (Two way channel) उपयोग शेतकऱ्यांकरीता करू शकतात. यामुळे कृषी समस्याचे निर्मुलन घडून कृषी क्षेत्रामध्ये बदल घडून येण्याची आजही आवश्यकता आहे.

**संदर्भ सूची :-**


- Deshmukh, P. (1953, January 7). Broadcast of the Japanese method of paddy cultivation. Conference of Food Ministers.
- Deshmukh, P. (1954, July 14). At the conference of State Ministers of Agriculture, Cooperation, and Animal Husbandry. Srinagar.
- Deshmukh, P. (1954, July 16). Speech at the Farmer Conference. Srinagar.
- Deshmukh, P. (1954, September 19). Speech at the inauguration of the executive committee of All India Co-operative Union.
- Deshmukh, P. (1955, April 3). Farmer form farmed. New Delhi.
- Deshmukh, P. (1959, December 11). World Agriculture Fair. New Delhi.
- Deshmukh, P. (1954, July 30). Speech at the 70th meeting of the Indian Central Cotton Committee. Bombay.


***